भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ११८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०३/२०१८

**१) संगनमत करून अनाधीकृत घरात प्रवेश करून सामानाची तोडफोड करून नुकसान करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक ०२/०३/२०१८ चे २१.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घरी अनाधीकृतपने प्रवेश करून फिर्यादीला मारहान करून तसेच फिर्यादीचे आईला शिवीगाळ करून घरातील सामानाची तोडफोड व नुकसान करून, जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी कार्तीक अनील डेकाटे वय २४ वर्ष रा. समता नगर २ भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४८,३२३,४२७,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मा. उपविभागीय दंडाधीकारी साहेब भंडारा यांचे आदेशाचे उल्लघन करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक ०३/०३/२०१८ चे १३.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हा मा. उपविभागीय दंडाधिकारी साहेब भंडारा यांचे आदेश क्र. फौ.मा. प्र. ०१/१७ कलम ५६ (१) (अ) (ब) मुपोका. दि. ०२/०८/२०१७ अन्वये भंडारा व नागपुर जिल्हयातुन ०२ वर्षा करीता हद्दपार करण्यात आले असतांना सुध्दा घटने वेळी नमुद ठिकाणी मिळुन आल्याने व त्याने मा. उपविभागीय दंडाधिकारी साहेब भंडारा यांचे आदेशाचे उल्लघन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गोंडाने यांचे. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) फेसबुकवर फोटो टाकुन बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. —**

दिंनाक २८/०२/२०१८ चे १५.०० ते दि. ०३/०३/२०१८ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हिचे आरोपी सोबत चांगले संबध होते, त्या कालावधी मध्ये आरोपीने फिर्यादीचे फोटो काढुन घेतले होते, नंतर फिर्यादी कडे आरोपी वाईट नजरेने पाहत असल्याची फिर्यादीला शंका आल्याने, आरोपी सोबत बोलने बंद केले यातील आरोपीने फिर्यादीची कोणतीही संमती न घेता फेसबुकवर फिर्यादी सोबतची फोटो टाकुन, तिला बदनामी करण्याचा उद्देशाने, फेसबुकवर प्रसारीत केल्याबाबत फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५४,(सी) भादवी. सहकलम ६६ ई आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. मानकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारहान केल्याने गुन्हा नोंद. —**

दिंनाक ०३/०३/२०१८ चे १७.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपीच्या मुलीसोबत नमुद घटणा ठिकाणी भांडण सुरू असतांनी आरोपी हा त्याचे पत्नी सोबत उभा असता फिर्यादी गेल्याने आरोपीने फिर्यादीला पाहुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारहान केल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) जानीवपुर्वक खोटे सांगुन विश्वासघात करून फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. —**

माहे डिसेंबर २०१७ ते आज पावे तो यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी व सोबतचे ५ विद्यार्थी यांचे परीक्षा फी घेवुन त्यांचे परीक्षा फार्म विद्यापीठात जमा न करता त्याचे हॉल तिकीट न मिळाल्याने परीक्षेपासुन वंचीत राहीले हे माहीत असुन सुध्दा हॉल तिकीट मिळणार असे जानीवपुर्वक खोटे सांगुन विश्वासघात केला व भरलेली फि रक्कम १,६००/रु.ची फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४०७,४२०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) दोन मोटार सायकल एकमेकाला धडक देवुन एकमेकास दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. —

दिनांक ०२/०३/२०१८ चे १२.०० यातील आरोपी चालकाने आपआपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन आमोरा समोर धडक देवुन दोन्ही मोटार सायकल चालक एकमेकांना दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रायपुरकर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पंचबुधे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

७) राजा कंपनीच्या बॅटऱ्याची चोरी . —

दिनांक २६/०२/२०१८ ते दि. २७/०२/२०१८ चे रात्र दरम्यान यातील आयडीया व वोडाफोन टॉवरला लावलेल्या अमर राजा कंपनीच्या २४ बॅटरी कॅबीनेटचे कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने २४ बॅटऱ्या कि. ७५,०००/रु चा माल चोरून नेल्याने फिय्रदी आशीष श्रीराम बावणकर वय ३१ वर्ष रा. खापा  यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

८) १०० टक्के जळाल्याने इसमाचा मृत्यु . :—

दिनांक २/०३/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील मृतक ओमप्रकाश नारायण पातोडे वय ३३ वर्ष रा. सालई याने स्वतःचे अंगावर मातीचा तेल टाकुन १०० टक्के जळाल्याने  त्यास उपचारकरीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे  भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०२/०३/२०१८ ला मरन पावल्याने मरण पावल्याने पो.स्टे. भंडारा येथे मृतकचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार  पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

९) मृत अवस्थेत इसमाचा प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद. :—

दिनांक ३/०३/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सिध्दार्थ उर्फ बंडु वैजेश्वर ऊके वय ३६ वर्ष रा. गौतम नगर पवनी हा एड्स रोगाच्या आजाराने ४ ते ५ वर्षा पासुन त्रस्त असुन मृतचा मुलगा शैलेश ऊके रा. नागपुर याने यातील फिर्यादीला फोन करून वडील मृतक बाबत मरण पावल्याची माहीती फोन द्वारे दिल्याने फिर्यादी हा स्वतः मृतक राहत असलेल्या ठिकाणी जावुन पाहीले असता, मृतक हा मृत अवस्थेत मिळुन आल्याने व मृतकचा मृत्यु एड्सचा आजाराने झाला आहे, असे फिर्यादी निर्देश रामलाल गेडाम वय २७ वर्ष रा. ईटगाव यांचे  तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा मस्के  पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

१०) अवैध दारु  अड्डयांवर धाडी . :—

दिनांक ०३/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, आंधळगाव  व साकोली  येथे अवैध दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७० लिटर हातभट्टी दारू किंमती ६,००० —रु. व  ४ लिटर ८६० मिलीलीटर देशी दारू किंमती ७,४५४/—रु. माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०३/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०३ तीन सिटर वाहनाकरीता ११ ईतर वाहनांवरती — ४३ केसेस करण्यात आले आहे.

04.3.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस  उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.